# <u>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे</u>
## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा सन 2017-18
## BEO/AO LOGIN मधील परीक्षा केंद्र निश्चिती करणेबाबचा कृतीओघ तक्ता (FLOW CHART)

| |
|---|
| (1) puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळास भेट द्या. |
| ⇩ |
| (2) Home Page वरील डाव्या बाजूस देण्यात आलेल्या EO/EI/AO/BEO Login या पर्यायावर क्लिक करावे. EO/EI/AO/BEO Login Page वरील Designation या ड्रॉप डाऊनमधून आपले पद निवडावे. User Name & Password या रकान्यामध्ये आपणास ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेल्या User Name व Password च्या आधारे लॉगीन करावे. |
| ⇩ |
| (3) लॉगिन केल्यानंतर आपणास स्क्रिनवर डाव्याबाजूस BEO Dashboard मध्ये इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी या हेडिंगच्या अंतर्गत Summery Report, Schoolwise Report, Compair Center List असे स्वतंत्र पर्याय उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. |
| ⇩ |
| (4) Summery Reports वर क्लिक केल्यानंतर आपणास आपल्या तालुक्यातील ज्या शाळांनी शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी 2018 करीता ऑनलाईन आवेदनपत्र भरले आहेत. त्या शाळांची एकुण संख्या, एकुण नोंदणीकृत विद्यार्थी संख्या, एकुण विद्यार्थ्यांपैकी दिव्यांग विद्यार्थी संख्या व प्रवर्गनिहाय विद्यार्थी संख्या दिसतील. ज्या शाळांनी शुल्क भरले आहे अशा शाळांची माहिती उपरोक्तप्रमाणे Details of Successful Registrations या हेडिंगच्या अंतर्गत दर्शविण्यात आली आहे. तसेच ज्या शाळांनी शुल्क भरले नाही अशा शाळांची माहिती उपरोक्तप्रमाणे Details of Pending Registrations या हेडिंगच्या अंतर्गत दर्शविण्यात आली आहे. |
| ⇩ |
| (5) Schoolwise Report वर क्लिक केल्यानंतर आपणास आपल्या तालुक्यातील ज्या शाळांनी शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी 2018 करीता ऑनलाईन आवेदनपत्र भरले आहेत. त्या शाळांची यादी दिसेल. सदर यादीतील संबंधित शाळेच्या नावासमोरील Details या बटनावर क्लिक केल्यास त्या शाळेने भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी दिसेल. सदर Page वरील वरील उजव्या बाजूस Export To Excel या बटनावर क्लिक केल्यास आपल्या तालुक्यातील सर्व शाळांमधील ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी Download करता येईल. |
| ⇩ |
| (6) आपल्या तालुक्यातील परीक्षा केंद्रांची निश्चिती करण्यासाठी Compair Center List वर क्लिक करावे. Match & Confirm Center List या Page वरील Last Year Center List या ड्रॉप डाऊनमध्ये आपणास आपल्या तालुक्यातील मागील परीक्षेची परीक्षा केंद्र (परीक्षा केंद्र कोडसह) दिसतील. त्यापैकी या वर्षीकरीता जे परीक्षा केंद्र निश्चित करावयाचे आहे ते परीक्षा केंद्रावर क्लिक करावे. त्यावर क्लिक केल्यानंतर आपणास सदर परीक्षा केंद्राची सर्व माहिती डाव्या बाजूस दिसेल. |

उजव्या बाजूस त्याच परीक्षा केंद्राची सर्व माहिती युडायस कोडसह पुन्हा भरावयाची आहे. उजव्या बाजूस सदर परीक्षा केंद्राचा युडायस कोड टाकावा. युडायस कोड टाकल्यानंतर सदर शाळेची सर्व माहिती आपोआप सरल मध्ये भरलेल्या माहितीनुसार आपणास स्क्रिनवर दर्शविण्यात येईल. सदर परीक्षा केंद्राचे नाव बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच सदर माहितीमध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास त्या त्या रकान्यामध्ये दुरुस्ती करुन Submit या बटनावर क्लिक करावे.

⇩

(7) Submit या बटनावर क्लिक केल्यानंतर आपण पुन्हा Match & Confirm Center List या Page वर याल. याप्रमाणे मुद्दा क्रमाक 6 मध्ये नमुद केल्यानुसार आपल्या तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रांची निश्चिती करावी. मागील परीक्षेचे जे परीक्षा केंद्र या परीक्षेसाठी घ्यावयाचे नाही त्या परीक्षा केंद्रास Last Year Center List या ड्रॉप डाऊनमधून निवडू नये.

⇩

(8) Match & Confirm Center List या Page वरील उजव्या बाजूस Add New Center List या बटनावर क्लिक करुन आपणास ज्या शाळेमध्ये परीक्षा केंद्र दयावयाचा आहे त्या शाळेचा 11 अंकी युडायस कोड टाकावा. युडायस कोड टाकल्यानंतर सदर शाळेची सर्व माहिती आपोआप सरल मध्ये भरलेल्या माहितीनुसार आपणास स्क्रिनवर दर्शविण्यात येईल. सदर परीक्षा केंद्राचे नाव बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच सदर माहितीमध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास त्या त्या रकान्यामध्ये दुरुस्ती करुन Submit या बटनावर क्लिक करावे. अशाप्रकारे आपणास आपल्या तालुक्यातील विद्यार्थी संख्येनुसार आवश्यक तेवढी परीक्षा केंद्र Add करता येतील.

⇩

(9) उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर आपणास Match & Confirm Center List या Page वर आपण निश्चित केलेल्या सर्व परीक्षा केंद्रांची एकत्रित यादी दिसेल. त्यामध्ये काही दुरुस्ती अथवा एखादे परीक्षा केंद्र Delete करावयाचे असल्यास संबंधित परीक्षा केंद्राच्या नावासमोरील Edit/Delete यापैकी आवश्यक त्या पर्यायांचा वापर करावा.

⇩

(10) अशाप्रकारे इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता स्वतंत्रपणे परीक्षा केंद्रांची निश्चिती करावी.